## जाहीर सूचना (नोटीस)

रत्नागिरी जिल्हयातील राष्ट्रीय भूमि अभिलेख कार्यक्रमांतर्गत कामकाज करणा-या अधिकारी व कर्मचा-यांसाठी नवीन BIOMETRIC DEVICE पुरविणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने BIOMETRIC DEVICE पुरवठा करणाऱ्यांना सूचित करण्यात येत आहे की, या कार्यालयाला आवश्यक असणाऱ्या BIOMETRIC DEVICE चा पुरवठा करण्यासाठी दर पत्रके मागविण्यात येत आहेत.

| Sr. No. | Product Description | Quantity |
|---|---|---|
| 1 | Product Name - SecuGen Hamster Pro 20<br>Model Number - HU20<br>(including 3 years Carry In Warranty) | 107 |

सदरचे बायोमेट्रीक डिव्हाईस पुरवठा करण्यास इच्छुक असणा-यांनी दिनांक 13.01.2021 ते दिनांक 19.01.2021 पर्यंत बायोमेट्रीक डिव्हाईसचे दर पत्रक नायब तहसीलदार, कुळवहिवाट शाखा, जुनी प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी येथे समक्ष सकाळी 10.00 ते सायंकाळी 5.00 या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व वेळी लेखी बंद लखोटयात (लिफाफ्यावर आर्थिक लखोटा नमूद करावे) सादर करावे. अटी आणि शर्तीमध्ये नमूद धनाकर्ष आणि अन्य कागदपत्रे स्वतंत्र लखोटयामध्ये (लिफाफ्यावर तांत्रिक लखोटा नमूद करावे) सादर करणेत यावीत. मुदत संपल्यानंतर आलेल्या दर पत्रकांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. पुरवठा करावयाच्या साहित्याबाबत अधिक माहितीसाठी तसेच अटी व शर्तीबाबत संगणक कक्ष, दुसरा मजला, जुनी प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय येथे संपर्क साधावा.

प्राप्त झालेली पुरवठादार यांची दरपत्रके दिनांक 20.01.2021 रोजी सकाळी 11.00 वाजता निवासी उपजिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे दालनात उघडण्यात येतील याची नोंद घ्यावी.

**क्रमांक. संगणक/ई-म्युटेशन/दरपत्रक/01/2021**
**जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी**
**दिनांक - 12.01.2021**

**( दत्ता भडकवाड )**
**निवासी उपजिल्हाधिकारी**
**तथा डी.डी.ई. रत्नागिरी**

प्रतिलिपी :-

1. जिल्हाधिकारी कार्यालय,रत्नागिरी यांचे सूचना फलकावर प्रसिध्दीसाठी
2. जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी यांजकडे

2/- सदरची जाहीर सूचना(नोटीस) जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळांवर प्रसिध्द करणेत यावी.

3. उपविभागिय अधिकारी रत्नागिरी/ तहसिलदार रत्नागिरी यांचे प्रसिध्दीफलकावर प्रसिध्दीसाठी.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन


जिल्हाधिकारी अधिकारी, रत्नागिरी यांचे कार्यालय.

पत्ता :- संगणक कक्ष, दुसरा मजला, जुनी प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी

दुरध्वनी क्रमांक :- 02352-222139, ई मे आयडी:- tncrat@gmail.com


---

राष्ट्रीय भूमि अभिलेख कार्यक्रमांतर्गत रत्नागिरी जिल्हयातील कामकाज करणा-या अधिकारी व कर्मचा-यांसाठी नवीन BIOMETRIC DEVICE पुरविणे आवश्यक आहे. त्यासाठी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मान्यताप्राप्त पुरवठादारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

**अटी व शर्ती:-**

1. दरपत्रक दाखल करतेवेळी दरपत्रकासोबत बायोमेट्रीक डिव्हाईस यासाठी खर्चाची अपेक्षित अंदाजे रक्कम 2,51,878/- च्या अनुषंगाने 3 टक्के अनामत रक्कम रू. 7,556/- (अक्षरी रू. सात हजार पाचशे छप्पन मात्र) स्टेट बँक ऑफ इंडिया, रत्नागिरी येथील बँकेचा, तहसीलदार सर्वसाधारण जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी, यांचे नांवे धनाकर्षाव्दारे (Demand Draft) जोडलेली असावी. अनामत रक्कम भरलेली नसल्यास दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही.
2. धनाकर्ष आणि इतर आवश्यक कागदपत्रे (दरपत्रक वगळून) स्वतंत्र लखोटयामध्ये (तांत्रिक लिफाफा असे वर नमूद करून) सादर करावा. (GST नोंदणी क्रमांक, पॅन कार्ड, आधार कार्ड छायांकित प्रती)
3. दरपत्रक स्वतंत्र लखोटयामध्ये (आर्थिक लिफाफा असे वर नमूद करून) सादर करावे.
4. जिल्हा कार्यालयातील वरिष्ठ अधिका-यांच्या सूचनेनूसार आणि त्यांचे मार्गदर्शनाप्रमाणे रत्नागिरी जिल्हयातील जिल्हा मुख्यालयी तसेच तालुका मुख्यालयी ठिकाणी व कोणत्याही वेळी मागणीनुसार नवीन BIOMETRIC DEVICE चा पुरवठा करणे पूरवठादार यांचेवर बंधनकारक आहे.
5. केंद्र शासनाच्या वस्तू व सेवा कर अधिनियम 2017 मधील तरतुदीनुसार दरपत्रक सादर करताना त्यामध्ये GST स्वतंत्र नमुद करुन दर पत्रक सादर करावे.
6. शा.नि. वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई दि. 22.04.2008 मधील तरतुदीनुसार देयकाची मूळ रक्कम (GST वगळून) विचारात घेवून त्यावर शासन निर्णयात नमूद केलेल्या दराप्रमाणे TDS ची रक्कम कपात करून घेणेत येईल.
7. पुरवठादार यांचे खरेदी प्राधिकारी यांचेशी हितसंबधाचा संघर्ष नसल्याबाबत आणि इच्छुक संस्थेने एकल निविदा देणेबाबत पुरवठादार यांनी लेखी हमी देणे आवश्यक आहे.
8. पुरवठा दाराने सर्व साहित्य पोहोच करणेचे आहे त्यासाठी इतर कोणताही खर्च किंवा आकार देय होणार नाही.
9. पुरवठादारास कोणत्याही प्रकारचे अग्रिम (अॅडव्हान्स) दिला जाणार नाही.
10. सर्व सामग्री / साहित्य उत्तम प्रतीचे /दर्जाचे असणे बंधनकारक राहिल.
11. काम पूर्ण झाल्यानंतर सर्व देयके तीन प्रतीत सादर करणेत यावीत. देयक प्राप्त झालेनंतर अनुदान उपलब्धतेनुसार देयेके अदा करणेची कार्यवाही करणेत येईल.

12. वरील कोणत्याही अटीचा भंग झाल्यास आणि बायोमेट्रीक डिव्हाईसचा पूरवठा वेळेवर न झाल्यास अनामत रक्कम रू.7,556/- (अक्षरी रू. सात हजार पाचशे छप्पन मात्र) जप्त करुन सरकारजमा करणेत येईल.

13. मंजूर दरपत्रकाचा वैधता कालावधी मंजूरी दिनांकापासून एक वर्षापर्यंत राहिल.

14. दरपत्रक मंजूर झालेल्या पुरवठादाराने जिल्हाधिकारी रत्नागिरी यांनी ठरवून दिलेल्या विहीत नमुन्यात रु.200/- (अक्षरी रु. दोनशे मात्र) इतक्या रकमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा लिहून देणे बंधनकारक राहील.

15. कोणत्याही अटीच्या अर्थाबद्दल किंवा इतर कोणत्याही बाबतीत विवाद उद्भवल्यास जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचा निर्णय अंतीम व बंधनकारक राहील.

16. सदरची दरपत्रक सूचना व त्यातील कोणताही भाग कोणतीही पूर्व सूचना न देता रदद् करणेचा /राखून ठेवणेचा तसेच सुधारणा करणेचा हक्क जिल्हाधिकारी रत्नागिरी यांनी राखून ठेवला आहे.

17. दरपत्रकातील नमुद साहित्याचा पुरवठा शासनाकडून झाल्यास सदर साहित्य पुरवठादाराकडून मिळवून घेणे जिल्हाधिकारी यांचेवर बंधनकारक राहणार नाही.

18. दरपत्रक मंजूर केल्याच्या दिनांकापासून ते एक वर्षापर्यंतच्या कालावधीमध्ये आवश्यकतेनुसार संबंधीत साहित्याचा पुरवठा करणे पुरवठादारावर बंधनकारक आहे.

साहित्याच्या तपशिलाबाबत / दर्जाबाबत शंका निर्माण झाल्यास किंवा अधिक माहितीची आवश्यकता असल्यास नायब तहसिलदार, कुळवहिवाट शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी यांचेशी तात्काळ संपर्क साधावा.

**(दत्ता भडकवाड)**
**निवासी उपजिल्हाधिकारी**
**तथा डी.डी.ई. रत्नागिरी**